# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पारनेर (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) कुकछी पट्टयातील गावांमधील पाणी समस्याबाबत**

**(१) १८८७५ (१७-०९-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) कुकछी पट्टयातील गावांमध्ये पाणी समस्या जाणवू लागली असल्याने या भागातही जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे व्हावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ मध्ये जिल्हाधिकारी तसेच पारनेर तहसिलदार यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार अभियानासारखे उपक्रम राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, आतापर्यंत तालुक्यातील किती गावांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) नाही.

(२) व (३) जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.०५ डिसेंबर, २०१४ अन्वये राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. तसेच शासन पत्र दि.०२ जानेवारी, २०१५ व १४ ऑगस्ट, २०१५ अन्वये जलयुक्त शिवार अभियान गाव निवड निकष निश्चित करण्यात आले आहेत.

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत पारनेर तालुक्यात सन २०१५-१६ करिता ३७ व सन २०१६-१७ करिता ३३ अशी एकूण ७० गावे तसेच श्रीगोंदा तालुक्यातील सन २०१५-१६ करता १४ व सन २०१६-१७ करिता १३ अशा एकूण २७ गावांची निवड करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील गोहगाव हाडे येथील जलयुक्त शिवार अंतर्गतच्या कामासाठी ग्रामसभचे अधिकारी उपस्थित नसणेबाबत**

**(२) २५७०५ (१०-०९-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोहगांव हाडे (ता.रिसोड, जि.वाशिम) हे गांव जलयुक्त शिवार योजने अंतर्गत समाविष्ट आहे व त्या ठिकाणी जलयुक्त शिवारामधील कामे घेणे संदर्भात सरपंच व ग्रामस्थ अभिनिस्त होते, हे दिनांक ९ जून, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोहगांव येथे शिवारफेरी काढून ग्रामसभेमधून कामांची निवड करण्यासंदर्भात कृषि विभाग, जलसंधारण विभाग, सिंचन विभाग जिल्हा परिषद या विभागाच्या अधिका-यांच्या उपस्थितीत ग्रामसभा आयोजीत करण्यासंदर्भात विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती रिसोड यांच्या निर्देशानुसार दिनांक १० जून, २०१५ रोजी ग्रामसभा आयोजीत केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामसभेस ग्रामसचिवाशिवाय कोणत्याही विभागाचा अधिकारी उपस्थित नव्हता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आता पावसाळा सुरु झाला असल्यामुळे गोहगांव हाडे येथील जलयुक्त शिवाराची कामे होवू शकत नसल्यामुळे व पुढील वर्षीच्या आराखड्यात सदर गावाचा समावेश होवू शकत नसल्यामुळे हे गांव योजने पासून वंचीत राहणार आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) या संदर्भातील दोषी अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय, नसल्यास याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय ?

**प्रा. राम शिंदे (१८-०३-२०१७) :**(१) व (२) होय हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

तथापि, सदरची ग्रामसभा दि.१०/०६/२०१५ ऐवजी अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी रिसोड, तहसिलदार रिसोड यांनी निश्चित केलेल्या कार्यक्रमानूसार दि. २२/०६/२०१५ रोजी घेण्यात आले. सदर ग्रामसभेस मा.लोकप्रतिनिधींसह उपविभागीय अधिकारी रिसोड, तहसिलदार रिसोड, तालुका कृषि अधिकारी, संबंधीत कृषि सहाय्यक व इतर यंत्रणेचे पदाधिकारी उपस्थित होते.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील सिंचनाच्या कामात अनियमितता झाल्याबाबत**

**(३) ३६८३२ (१२-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परीषदेच्या सिंचन विभागाने वरुड तालुक्यातील झालेल्या पिंपडखुटा आणि आसोना येथे केलेल्या सिंचन तलावाच्या कामात अनियमितता झाली असल्याची तक्रार स्थानिक जिल्हापरीषद सदस्य यांनी जिल्हा परीषद प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीचे अनुषंगाने चौकशी समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्यात दोषी आढळून आलेल्या विरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०३-२०१७)** :(१) व (२) होय.
(३) चौकशी अधिकारी यांचा गोपनिय चौकशी अहवाल प्राप्त झालेला असून त्यानुसार संबंधीत उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आलेली होती. त्यांचे व्दारे प्राप्त खुलासा मान्य करण्यात आला असून संबधीत उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्या दि. ०६/०१/२०१७ च्या पत्रान्वये दोषमुक्त करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कलानंदी गडाच्या विकासासाठी निधी मिळण्याबाबत

**(४) ४५३७४ (२०-०५-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कलानंदी गडाच्या विकासासाठी मा.पर्यटन मंत्री यांचेकडे ५ कोटी रुपयाची मागणी माहे नोव्हेंबर, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात केली आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१७)** :(१) स्थानिक लोकप्रतिनिधींचे अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) व (३) याप्रकरणी कलानंदीगडावरील रु.१९३.१९ लक्षच्या कामांना दि.४/१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून रु. २० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

**कंधार व लोहा तालुका (जि.नांदेड) येथील पाच प्रगतीपथावरील सिंचन प्रकल्पासाठी १५ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता दिल्याबाबत**

**(५) ४५७९३ (२९-०४-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार व लोहा तालुका (जि.नांदेड) येथील पाच प्रगतीपथावरील सिंचन प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या जलसंधारण विभागाने १५ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यासाठी मान्यता दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांच्या पुढील कामासाठी निधी मिळाल्याने उर्वरित प्रकल्पाचे प्रलंबित काम पुर्ण होण्याबाबत शासनाने आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नांदेड जिल्हयाच्या कंधार व लोहा तालुक्यातील १३ साठवण तलावांच्या रु.५७.९० कोटी खर्चाच्या कामासाठी शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने आतापर्यंत एकुण रु.२८.३९ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधीमधील रु.१५.०० कोटी रक्कम पळसवाडी, कंधारेवाडी, गोगदरी, कदमाची वाडी, येलदरी हे साठवण तलाव भैतिकदृष्ट्या पूर्ण झाले आहेत. अन्य ०८ योजना प्रगतीपथावर असून निधीच्या उपलब्धतेनुसार त्यादेखील पूर्ण करण्यात येणार आहेत.

---

**अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत**

**(६) ४५८३८ (२९-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) येथे जलयुक्त शिवार योजनेचा काही प्रमाणात फायदा झाला असला तरी तेथील बहुतांश शेतकरी सावकारी व्याजाचे पैसे काढून पीक व जनावरे जगविण्यासाठी बोअर पाडत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील पाण्याचा ठावकिकाणा सांगणारे पानाडीही अचुकपणे पाण्याचा स्त्रोत सांगु शकत नाहीत तसेच काही प्रगतशील शेतकऱ्यांनी आधुनिक शेतातील सारे प्रयोग करुन पाहिले असुनही ते व्यर्थ गेले आहेत तरी अक्कलकोट तालुक्यातील दुष्काळ परिस्थिती लक्षात घेता शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) अक्कलकोट तालुक्यातील पाणी परिस्थितीचा विचार करता शासनाने पुढीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

i. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत लोकसहभागातून एकूण १४८८७९१ घ.मी. गाळ काढण्यात आला.

ii. बोरी नदीचे खोलीकरण व रुंदीकरण तसेच सन २०१६-१७ मध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत ८५० विहिरी / बोअर पुनर्भरण करण्यात आले आहे.

iii. टँकरने पाणीपुरवठा केलेली गावे - जेऊर, हंजगी व वागदरी.

iv. ११ गावांमध्ये १६ विहीर / बोअर अधिग्रहण करुन गावांना पाणीपुरवठा केला आहे.

v. भूजल अधिनियम २००९ ची कडक अंमलबजावणी.

vi. माहे ऑक्टोबर, २०१५ ते जून २०१६ पर्यंत टंचाई आराखडा तयार करुन पाणी टंचाईचे नियोजन केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चोपडा व यावल (जि.जळगांव) तालुक्यातील अत्यंत कमी गावांचा समावेश जलयुक्त शिवार योजनेत केल्याबाबत

**(७) ४८२७८ (२९-०४-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील चोपडा व यावल तालुक्यातील अत्यंत कमी गावांचा समावेश जलयुक्त शिवार योजनेत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील बहुसंख्य साठवण बंधारे गाव तलाव व पाझर तलाव हे सन २०१२ च्या अतिवृष्टीनंतर नादुरुस्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही दुरुस्तीची कामे निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चोपडा व यावल तालुक्यातील जास्तीत जास्त गावांचा जलयुक्त शिवार अभियानांत समावेश करुन निधी उपलब्ध करुन देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

चोपडा व यावल तालुक्यात अनुक्रमे १५२ व २५२ कामे करण्यात आली आहेत. सदर को.प.बंधारे, पाझर तलाव, गावतळे व साठवण बंधारे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये चोपडा व यावल तालुक्यात अनुक्रमे १० व ०७ गावांचा समावेश करण्यात आले असून प्रस्तावित कामांचे सर्वेक्षण, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा कार्यवाही करणे इ. कामे प्रगतीत आहेत.

---

**नांदेड जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत अपुर्ण कामांबाबत.**

**(८) ५२७७४ (२४-०८-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जिल्हयात २५९२७ कामांना मंजूरी दिलेली असून त्यापैकी २५७६ कामे पुर्ण झालेली आहेत व उर्वरित सर्व कामे अपुर्ण स्थितील असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास अपुर्ण कामे पुर्ण करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती उपाययोजना केली. वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

नांदेड जिल्हयात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत विविध यंत्रणा मिळून सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये अनुक्रमे १७०२५ व ५३६ अशी एकूण १७५६१ कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(२) नांदेड जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये ७११ व २०१६-१७ मध्ये ८०२ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रत्येकी ३ लक्ष रुपयांच्या १५० कामांना नियमबाहय रित्या विना निवीदा कामे दिल्याबाबत**

**(९) ५३२०९ (२६-०४-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रत्येकी ३ लक्ष रुपयांचे १५० कामांना कृषी विभागाकडून मंजूरी देण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ च्या अन्वये रु.३ लक्ष पेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणाली कार्यरत असून सुध्दा सदरील कामांची ई-निविदा न काढता गुत्तेदारास नियमबाहय रित्या विनानिविदा १५० कामांचे काम देण्यात आल्यामुळे हे काम रदद करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्यात यावी अशी जनतेकडून मागणी होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास चौकशी अंती संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

जानेवारी, २०१६ पर्यंत जलयुक्त शिवार अभियानांतर्गत १०० कामांना प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी १४ कामे दि. २६ मे, २०१५ पूर्वी करण्यात आली असून उर्वरित ८६ कामे ई-निविदा पध्दतीने करण्यात आलेली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत रु.३१.९८ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार तालुक्यातील (जि.बुलढाणा) विविध यंत्रणामध्ये समन्वय नसल्याने जलयुक्त शिवार योजना अयशस्वी ठरत असल्याबाबत**

**(१०) ५४८३५ (२४-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार तालुक्यातील (जि.बुलढाणा) विविध यंत्रणामध्ये समन्वय नसल्याने जलयुक्त शिवार योजना अयशस्वी ठरत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत आराखडयात समावेश करण्यात आलेल्या गावांमध्ये कृषि विभागाव्यतिरिक्त इतर यंत्रणेकडून ज्या प्रमाणात कामे होणे गरजेचे असतांना त्या पध्दतीने कामे झाली नाहीत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत लोणार तालुक्यात सन २०१५-१६ मध्ये कृषि विभागामार्फत ७७६ पैकी ५०३ कामे, वन विभाग ४४ पैकी ३७, सिंचन विभाग २१ पैकी १३, वरिष्ठ भुवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास सर्व १४, खडकपूर्णा विभाग देऊळगाव १७ पैकी ८ व सामाजिक वनीकरण विभाग २ अशी एकूण ८७४ कामांपैकी ५७७ कामे पूर्ण करण्यात आली असून ३४ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सांगली, कोल्हापूर, अमरावती, चंद्रपूर या जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजना राबविण्याबाबत**

**(११) ५५६१८ (२४-०८-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सांगली, कोल्हापूर, अमरावती, चंद्रपूर जिल्ह्यात पाण्याच्या अतिवापरामुळे होणारी जमिनीची हानी टाळण्यासाठी जलयुक्त शिवार योजना राबविण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१०-०३-२०१७)** :(१) हे खरे नाही.

तथापि, सांगली जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडलेल्या कारंदवाडी ता.वाळवा येथे लोकसहभागातून पाणी निचरा चर काढणेत आले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये सिंचन गैरव्यवहारात दोषी असणाऱ्या**
**अधिकारी व कर्मचारी यांच्या विभागीय चौकशीबाबत**

**(१२) ५७६३४ (१८-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये सिंचन गैरव्यवहारात अधिकारी व कर्मचाऱ्यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला असता खुलासा समाधानकारक नसल्याने सदरहू अधिकारी व कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधीत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०३-२०१७)** :(१) होय.

(२) वर्ग-३ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी जिल्हा परिषदे मार्फत सुरु असून वर्ग-१ व २ च्या ४ अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करुन त्यापैकी २ अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव जलसंपदा विभागास, १ अधिकाऱ्याच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग तर उर्वरित १ अधिकाऱ्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविल्याचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनास कळविले आहे.

(३) विभागीय चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधीत प्रशासकीय विभागाद्वारे नियमानुसार पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलुर (जि.नांदेड) तालुक्यातील पाझर तलावाच्या कामास मंजुरी देणेबाबत**

**(१३) ५७८७८ (२४-०८-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील १.रमनापुर, २. बेंबरा, ३ मानुर, ४ मरखेल, ५. चव्हाणवाडी क्र. १,५ चव्हाणवाडी क्र.२, ६ लोणी क्र २, ७ हणेगाव क्र. ३ (ता. देगलूर) येथील पाझर तलावाच्या कामास मंजुरी देण्यात येऊन कार्यारंभ आदेश देऊनसुध्दा कामे निधी अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलब्धतेबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील विषय क्रमांक ०८ (४९/२०१५) अन्वये महामंडळामार्फत दिनांक ०१ एप्रिल, २०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या (१२०० योजना) तसेच दिनांक ०१ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या (११३० योजना) परंतु प्रत्यक्षात क्षेत्रीय कामे सुरु झाली नाहीत अशा एकूण २३३० स्थगिती दिलेल्या योजनांपैकी दिनांक ०१ एप्रिल, २०१४ पूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेल्या ११३० योजनांपैकी जलयुत शिवार अंतर्गत येणाऱ्या १०१ योजनांची कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यास महामंडळाच्या संचालक मंडळाने मान्यता दिली आणि उर्वरित स्थगिती दिलेल्या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली.

नांदेड जिल्हयातील (१) रमतापुर क्र.१, (२) रमतापुर क्र.२, (३) बेंबरा क्र.३, (४) मानुर क्र.१ (५) मरखेल क्र.१ अशा एकूण ६ पाझर तलाव योजनांना स्थगिती दिलेल्या ११३० योजनांमध्ये समावेश आहे. त्यामुळे संचालक मंडळाच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी संपन्न झालेल्या ४९ व्या बैठकीतील पारीत ठरावास अनुसरुन उपरोक्त ६ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ चे पत्रान्वये विविध टप्प्यातील योजनांना स्थगिती देण्यात आली आहे. त्यानुषंगाने उर्वरित (१) चव्हाणवाडी क्र.१, (२) चव्हाणवाडी क्र.२, (३) लोणी क्र.३ अशा एकूण तीन योजनांना सद्य:स्थितीत स्थगिती आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौदा (जि.नागपूर) तालुक्यामधील कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीकरीता लाखो रुपयांचा खर्च करुनही बंधारे कोरडे असल्याबाबत**

**(१४) ५७९०५ (२४-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यामधील कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीकरीता लाखो रुपयांचा खर्च करुनही बंधारे कोरडे असल्याबाबतची बाब माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौदा तालुक्यातील खरडा शिवारातील मशासूर नाल्यावर परिषदेच्या लघु सिंचन विभागाच्या वतीने १३ लक्ष रुपये खर्च करुन १५ दिवसात बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बंधाऱ्यामध्ये पाणी अडविण्यासाठी वापरण्यात येणारे लोखंडी तराफे कंत्राटदारामार्फत लावण्यात न आल्यामुळे पावसाळ्यात पाणी अडले नाही, हे खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त कंत्राटदाराच्या हलगर्जीपणाकडे सिंचन विभागातील अधिकारी हेतुपुरस्पर दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या बंधाऱ्याच्या बांधकामात झालेल्या अपव्यवहाराचा व हलगर्जीपणाची चौकशी करुन संबंधित सिंचन अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०३-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

तथापि, मौदा तालुक्यातील खरडा शिवारातील मशासूर नाल्यावर जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागाच्या वतीने रुपये १३.९६ लक्ष निधी खर्च करण्यात आला असून दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ ते ३० एप्रिल, २०१५ या कालावधीत दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले.

(३) पावसाळा आटोक्यात येताच बंधाऱ्यात पाणी अडविणे अपेक्षीत असून या करीता बंधाऱ्याचे लोखंडी तराफे संबंधीत ग्रामपंचायतीकडे देण्यात आले आहेत.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजने अंतर्गत सन २०१५-१६ या वर्षात झालेल्या कामांच्या मुल्यमापनाबाबत**

**(१५) ५८५६७ (०१-०९-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार अभियानातील योजनेचे काम सुरु असताना करावयाचे मुल्यमापन (Concurrent Evaluation) ही प्रक्रिया उस्मानाबाद जिल्ह्यातील अंदाजे रु.१२० कोटीच्या कामांच्या बाबत संबंधीत शासन निर्णयाच्या अनुषंगाने झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे जलयुक्त शिवार अभियानातील योजनेचे काम सुरु असताना किमान दोन वेळेस मुल्यमापन करणे अपेक्षित असताना दिनांक १५ मे २०१६ पर्यंत एकाही कामाचा मुल्यमापन अहवाल उपलब्ध नव्हता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत कामांचे त्रयस्त संस्थेकडून करावयाचे मुल्यमापन (Third Party Evaluation) अजुनही सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाऊस पडल्यानंतर कामाचे मोजमाप करणे व दर्जा तपासणे कठीण होणार आहे व मूल्यमापनाची प्रक्रिया निरर्थक ठरणार आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त उस्मानाबाद जिल्ह्याच्या भविष्याच्या दृष्टीने झालेली जलयुक्त शिवार योजनेची कामे अतिशय महत्वाची असून या कामांचा दर्जा आता कसा तपासण्यात येईल याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शासन निर्णयात उल्लेख केल्याप्रमाणे मूल्यमापनाची प्रक्रिया करण्यात आली नसल्यास शासनाने याबाबत चौकशी करून दोषींवर कोणत कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) उस्मानाबाद जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी यांनी तालुकानिहाय कर्मचाऱ्यांची नियुक्त करुन आतापर्यंत २४०३ कामांचे मुल्यमापन करण्यात आले आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानातील कामांचे मुल्यमापन करण्यासाठी पाच त्रयस्थ संस्थांना जिल्हास्तरीय समितीमार्फत मान्यता देण्यात आली आहे. सदर त्रयस्थ संस्थानी दि. २८/०९/२०१६ अखेर २१७ गावातील १८२७४ कामापैकी १५८३७ कामांचे (८५.९९%) मूल्यमापन केलेल्या कामांचे फेरमूल्यांकन करण्यासाठी गोखले इन्स्टिट्युट, पुणे यांना आदेश देण्यात आले आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलयुक्त शिवार अभियानातून पाणी साठे व सिंचन क्षमता निर्मितीबाबत**

**(१६) ५९५१२ (२४-०८-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी विधीमंडळ व विधीमंडळाबाहेर अनेकदा सन २०१५-१६ मध्ये केलेल्या जलयुक्त शिवार अभियानातील कामांमुळे २४ टी.एम.सी.पाणी साठा निर्माण होवून त्यामुळे ६.५ लक्ष हे. सिंचन क्षेत्र सिंचीत झाल्याचे जाहीर केले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास नव्याने निर्माण झालेल्या २४ टी.एम.सी.पाणी साठयाचे आणि सिंचन क्षेत्राचे कामाचे नावासहित गाव व तालुका निहाय तपशिलवार माहिती काय आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाच्या दि. २६ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रकान्वये तांत्रिक मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत त्यानुषंगाने प्राप्त माहिती खालीलप्रमाणे आहे.

सन २०१५-१६ मध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत राज्यात माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर ४१.७५ टी.एम.सी. पाणीसाठा क्षमता निर्माण झाली आहे. त्यामुळे एक संरक्षित सिंचन दिल्यास १२.५ लक्ष हे. व दोन संरक्षित सिंचन दिल्यास ६.२ लक्ष हे. क्षेत्र सिंचीत होईल ऐवढी क्षमता निर्माण झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्हयातील कृष्णा खोऱ्याअंतर्गत यांत्रिकी विभागाने पाझर तलाव दुरुस्तीच्या कामात केलेला गैरकारभार

**(१७) ६०२९५ (२४-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील कृष्णा खोऱ्याअंतर्गत यांत्रिकी विभागाने जिल्हयातील दुष्काळी तालुक्यातील प्राधान्याने पाझर तलाव दुरुस्तीची कामे तसेच जलयुक्त शिवार अभियानांअंतर्गत कामे लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता कॅनॉलच्या दुरुस्तीची कामे परस्पर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी सातारा तसेच मा.पालकमंत्री सातारा यांच्याकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत जळगाव जिल्हयात विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्याच्या सूचना

**(१८) ६१४७० (२४-०८-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत जळगाव जिल्हयातील ज्या गावांत कामे झाली त्या ग्रामस्थ्यांना त्यांच्या गावात झालेल्या कामांचा लेखी अहवाल देण्यासाठी विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्याच्या सूचना जलसंधारण विभागाच्या प्रधान सचिवांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हयातील यंत्रणेला दिला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सुचनेप्रमाणे विशेष ग्रामसभेचे आयोजन करून आढावा घेण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, या आढाव्यानुसार या कामांची सद्यस्थिती काय आहे ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) रावेर, यावल व जळगाव तालुक्यात जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये निवडलेल्या गावांतील आराखड्यानुसार १००% कामे पूर्ण झाली असून उर्वरित तालुक्यातील कामे अंतिम टप्प्यात आहेत.

---

**अहमदनगर जिल्हयात जलयुक्त शिवार अभियानातून करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची करुन निधीचा अपहार केल्याबाबत**

**(१९) ६२५८० (२४-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयात जलयुक्त शिवार अभियांनातून करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची करुन निधीचा अपहार केल्याची तक्रार जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडे आलेल्या आहेत मात्र तक्रारींची दखलच घेतली जात नसल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) तसेच, या अभियांनी कामे करण्यासाठी यावर्षी २६४ गावांची निवड केली मात्र प्रशासनाने अजूनही आराखडाच तयार केला नसून जिल्हयात जलयुक्तची कामे सुरुच झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलयुक्त शिवार अभियांनातर्गत झालेल्या निकृष्ट कामांची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, यावर्षी जलयुक्तीची कामे व्हावीत यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

अहमदनगर जिल्हयात जलयुक्त शिवार अभियान गाव निवड निकषानुसार सन २०१६-१७ मध्ये एकूण २६८ गावांची निवड करण्यात आली असून सर्व यंत्रणा मिळून एकूण रु.३२२.८५ लक्षचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर २६८ गावांमध्ये कएूण २७२८ कामे सुरु असून त्यापैकी १६२३ कामे पूर्ण झाली असून १२०४ कामे प्रगतीपथावर आहेत.

सदर कामांची तपासणी संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी करण्यात आली आहे. तसेच कामांचे मूल्यामापन त्रयस्थ संस्था गोखले इन्स्टिट्यूट पुणे यांचेमार्फत करण्यातआले असून त्यांनी या कामांबाबत समाधान व्यक्त केले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मुंबईसह शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालयातील प्राध्यापकांना एक वर्षाकरिता लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळण्याचा निर्णय घेतल्याबाबत.**

**(२०) ६५२२१ (१६-१२-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालयातील, सहाय्यक प्राध्यापक, गट ब ही पदे कायमस्वरुपी तसेच सहयोगी प्राध्यापक गट अ व प्राध्यापक गट अ ही पदे सार्वजनिक आरोग्याच्या धर्तीवर, एक वर्षाकरिता लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून, वगळण्याचा निर्णय दिनांक २ जुलै, २०१४ रोजी राज्य शासनाने घेतला, हे खरे आहे काय
(२) असल्यास, भारतीय राज्य घटनेने कलम ३१५ नुसार, लोकसेवा आयोगाची निर्मिती झाली असून, सदरहू पदे आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळताना, सुट विनियम सन १९५६ मधील बदलासाठी, मा.राज्यपालांची मान्यता न घेता तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन करुन, शासनाने सदरहू पदे आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी, मा. मुख्यमंत्री यांना, दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या निवेदनानुसार, शासनाने उक्त पदे पूर्ववत राज्य लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचे तातडीने आदेश देण्याच्या दृष्टीने, अद्‌याप कोणती कार्यवाही केली आहे,
(४) अद्‌याप, याबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सदरहू पदे आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळताना, सुट विनियम सन १९५६ मधील बदलासाठी मा.राज्यपालांची मान्यता घेण्यात आली होती. शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालये व रुग्णालयांतील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्यामुळे तसेच सेवानिवृत्त, राजीनामा इ. मुळे सदर रिक्त पदांच्या संख्येत पुन्हा भर पडणे, सदर रिक्त पदांसाठी पाठविण्यात आलेल्या मागणी पत्राच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांच्या शिफारशी होण्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून होणारा विलंब व त्यामुळे रुग्णसेवा व विद्‌यार्थ्यांच्या शैक्षणिकतेवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेऊन सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळण्यात आली आहेत.

(३) मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सरळसेवेने भरावयाची प्राध्यापक (गट-अ) व सहयोगी प्राध्यापक (गट-अ) ही पदे कायमस्वरुपी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळून सदर पदे शासन निर्णय दि. १५.७.२०१४ अन्वये तयार करण्यात आलेल्या अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांच्या अध्यक्षतेखालील निवड मंडळामार्फत भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दारिद्रय रेषेखालील रूग्णांना ॲजिंओग्राफी मोफत असतांना वैद्यकीय शिक्षण विभागाकडून वसुली होत असल्याबाबत.**

**(२१) ६५४३१ (१६-१२-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(l) राज्यातील दारिद्रय रेषेखालील रूग्णांना आरोग्य विभागाच्या रूग्णालयात ॲजिंओग्राफी मोफत असतांना वैद्यकीय शिक्षण विभागाच्या शासकीय रूग्णालयांमध्ये मात्र रूग्णांकडून ५ हजार रूपयांची वसुली केली जात आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, राज्यात लाखों कुटुंब दारिद्रयरेषेखालील गटात मोडतात अशा रूग्णांना मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा देण्याची जबाबदारी राज्य शासनाची असुनही त्यांना मोफत वैद्यकिय सेवा वैद्यकिय शिक्षण विभागाकडून दिल्या जात नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या दारिद्रय रेषेखालील तपासणीत रूग्णांवर राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत शस्त्रक्रिया केल्या जातात त्यांनतर वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रूग्णालयाकडून रूग्णांना ही रक्कम परत केली जात असल्याचा दावा केला जात असला तरी बऱ्याच रूग्णांना ते परत केले जात नाही, हे खरे आहे काय
(४) असल्याय, शासनाने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सावर्डे-आमतेवाडी (ता.पन्हाळा जि.कोल्हापूर) येथे सकस आहार खडी वनीकरण योजनेतून बाग साकारण्यात आल्याबाबत**

**(२२) ६५८३५ (०९-०१-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावर्डे-आमतेवाडी (ता.पन्हाळा जि.कोल्हापूर) येथे सकस आहार खडी वनीकरण योजनेतून बाग साकारण्यात आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर ठिकाणी विना परवाना बेकायदेशीर मुरुमाचे उत्खनन करून महसूल बुडविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१७) :**(१) सावर्डे-आमतेवाडी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथे वन विभागाच्या योजनेतून बाग साकारण्यात आलेली नाही.

(२) आमतेवाडी वन क्षेत्रात बेकायदेशिर मुरुमाचे उत्खनन करुन महसूल बुडविला असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भाल (ता. अलिबाग, जि.रायगड) येथील पाझर तलावाच्या नुतनीकरणाबाबत**

**(२३) ६५९८१ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाल (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे सुमारे ३० वर्षापूर्वी रायगड जिल्हा परिषदेंतर्गत पाझर तलावाचे काम पूर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर पाझर तलावाच्या परिक्षेत्रात थळ ग्रामपंचायत हद्दीतील भुते, भाल, वायशेत, तूरडाळ आदी गावांसह मान तर्फे झिराड व मुळे ग्रामपंचायत हद्दीतील गावांना पाझर तलावातून पाणी पुरवठा केला जातो, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर पाझर तलावाच्या परिसरात मोठयाप्रमाणात झाडी, झुडपे वाढली असल्याने पाझर तलावाचे नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर पाझर तलावाचे नुतनीकरण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०३-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) भाल पाझर तलावाचे नुतनीकरण करणेचा प्रस्ताव उप अभियंता, पाणी पुरवठा, रायगड जिल्हा परिषद, उप विभाग अलिबाग यांचेकडून तयार करणेत आलेला असून क्षेत्रिय स्तरावर परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोले तालुक्यातील (जि.अहमदनगर) काळेवाडी (जांभळे) व बदगी (खिळपाट) येथील साठवण तलावांना निधी न मिळाल्याबाबत**

**(२४) ६६५३३ (१६-१२-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले तालुक्यातील (जि.अहमदनगर) काळेवाडी (जांभळे) व बदगी (खिळपाट) येथील साठवण तलावांना दोन वर्षापूर्वी मान्यता देवूनही अद्याप निधी न दिल्याने साठवण तलावाचे काम करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही साठवण तलावासाठी निधी उभारुन साठवण तलावाचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०३-२०१७) :**(१) होय.

(२) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या दिनांक २४.०९.२०१५ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या ४९ व्या बैठकीतील विषय क्रमांक ०८ अन्वये, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक ०१.०४.२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या (१२०० योजना) तसेच दिनांक ०१.०४.२०१५ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या (११३० योजना) परंतु प्रत्यक्षात क्षेत्रिय कामे सुरु झाली नाहीत अशा एकूण २३३० स्थगिती दिलेल्या योजनांपैकी दिनांक ०१.०४.२०१४ पूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेल्या ११३० योजनांपैकी जलयुक्त शिवार अंतर्गत येणाऱ्या १०१ योजनांची (किंमत रुपये ५९.०० कोटी) कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आणि उर्वरित स्थगिती दिलेल्या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली. त्यास अनुसरुन उपरोक्त ०२ योजनांचा स्थगिती दिलेल्या ११३० योजनांमध्ये समावेश होता. त्यानुसार साठवण तलाव काळेवाडी (जांभळे), ता.अकोले, जि.अहमदनगर व साठवण तलाव बदगी (खिळपाट), ता.अकोले, जि.अहमदनगर या योजनाची महामंडळाने दिनांक ०७ मे, २०१६ चे आदेशान्वये प्रशासकीय मान्यता रद्द केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२५) ६६५३४ (१६-१२-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील जलयुक्त शिवार योजने अंतर्गत करण्यात आलेल्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्यामुळे जलयुक्त शिवाराची कामे आजतागायत अपूर्ण असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७)** :(१) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये शहापूर तालुक्यातील १३ गावांची निवड करण्यात आली आहे. सदर गावात १०५२ कामे प्रस्तावित करण्यात आली होती त्यापैकी माहे ऑक्टोबर, २०१६ अखरे १०२७ कामे पूर्ण करण्यात आली होती असून ७ कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामांमुळे २१३४ टी.सी.एम. पाणीसाठा क्षमता निर्माण झाला आहे.

भूजल सर्वेक्षण विभागाच्या मूल्यमापन अहवालानूसार शहापूर तालुक्यात सन २०१६ च्या माहे जानेवारी व मार्च मध्ये भूजल पातळीत वाढ झाली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोणार येथील (जि.बुलढाणा) वन्य जीव अभयारण्यात बिबटयांच्या अस्तित्वामुळे अभयारण्यातील पर्यटकांमध्ये भितीचे वातावरण असल्याबाबत

**(२६) ६६५८५ (०९-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार येथील (जि.बुलढाणा) खाऱ्या पाण्याच्या सरोवर परिसरातील वन्य जीव अभयारण्यात बिबटयांच्या अस्तित्वामुळे अभयारण्यातील पर्यटक व ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०२-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) लोणार सरोवर परिसरामध्ये बिबट्याचे अस्तित्व निदर्शनास आल्यामुळे सावधानतेच्या दृष्टीकोनातून खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- बिबट्याचा वावर असलेल्या क्षेत्रात पर्यटकांना फिरण्यास बंदी करण्यात आली आहे.
- सदर क्षेत्रात गस्त वाढवून लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे.
- अभयारण्य परिसरामध्ये सावधानता इशारादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत.
- पर्यटकांची प्रेक्षणीय स्थळे, प्रार्थना मंदीर या ठिकाणी व महत्वाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना आणि रोजंदारी मजूरांना हजर ठेवून सावधानतेचा इशारा देण्यांत आला आहे.

- अभयारण्यात ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

अभयारण्य क्षेत्रात बिबट्याचा आजही वावर आहे तथापि आजतागायत बिबट्याने मानवावर हल्ला केल्याची घटना घडलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरबाड तालुका (जि.ठाणे) कृषी विभांगातंर्गत मजूरांना देण्यात आलेला धनादेश वटला नसल्याबाबत**

**(२७) ६६७३० (१६-१२-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड तालुका (जि.ठाणे) कृषी विभांगातंर्गत वाल्हीवरे गावात पाणी अडवा योजनेमध्ये बंधारे बांधण्याचे काम करणाऱ्या मजूरांना देण्यात आलेले धनादेश बॅकेत जमा केल्यानंतर वटले नसल्याचे नुकतेच माहे सप्टेबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाचे कंत्राट सातारा येथील काटकर कंट्रक्शन कंपनीला देण्यात आला होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागाने काटकर कंट्रक्शन एजन्सीला देयकाचा धनादेश दिल्यानंतर कंत्राटदाराने आपली रक्कम काढून घेतली आहे परंतु मजुरांना त्यांच्या कामाचा मोबदला अदयापी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली काय

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय.

(५) वाल्हीवरे गावात १२ अनघड दगडी बांध गटाची कामे करण्यात आली आहेत. त्यामध्ये ११७ बांधांचा समावेश होता. सदर कामे मे.काटकर कन्ट्रक्शन यांना निविदा पध्दतीने देण्यात आली होती. शासनाद्वारे झालेल्या कामांची रक्कम रु.२८९४९२/- व ९८७०४/- या दोन धनादेशाद्वारे ठेकेदारास अदा करण्यात आली होती. तद्नंतर काटकर कंट्रक्शनच्या प्रतिनिधीनी रु. २,८०,०००/- चा धनादेश मजूरांचे प्रतिनिधी श्री.शिवराम कोरडे यांचे नावे दिला होता. तथापि खात्यात रक्कम कमी असल्याने सदर धनादेश बॅंकेत वटला नाही. त्यामुळे मजूरांनी दि. १३/०७/२०१६ रोजी तालुका कृषी अधिकारी,मुरबाड यांचेकडे तक्रार सादर केली होती.

याबाबत तालुका कृषि अधिकारी, मूरबाड यांनी सदर ठेकेदाराशी संपर्क साधून रक्कम अदा करणेबाबत कळविले. त्यानंतर संबंधित मजूरांची मजूरी ठेकेदाराद्वारे अदा करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंगरगाव (जि.चंदपूर) राजूरा जिल्हा परिषदेच्या सिंचाई विभागांतर्गत असलेला तलाव फुटल्याबाबत**

**(२८) ६६७५० (१६-१२-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंगरगाव (जि.चंदपूर) राजूरा जिल्हा परिषदेच्या सिंचाई विभागांतर्गत असलेला तलाव फुटल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तलाव फुटल्याप्रकरणी सिंचाई विभागाने अभियंत्याला कारणे दाखवा नोटीस दिली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०२-२०१७) :**(१), (२) व (३) होय.
(४) या प्रकरणात श्री.गडकरी, शाखा अभियंता, लघु सिंचन, जलसंधारण जिल्हा परिषद, उपविभाग राजूरा यांना जबाबदार धरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या दि. १०/१०/२०१६ च्या आदेशान्वये श्री गडकरी यांना निलंबीत करुन दि. २१/११/२०१६ रोजीच्या ज्ञापनाने दोषारोपपत्रे बजावून विभागीय चौकशी सुरु केल्याचे शासनास कळविले आहे.
(५) निरंक.

---

**मौजे खराडी (ता.हवेली, जि.पुणे) वनक्षेत्रात अनधिकृतपणे गौण खनिजे काढून वनक्षेत्राची नासधूस होत असल्याबाबत**

**(२९) ६७३२४ (२७-०१-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खराडी (ता.हवेली, जि.पुणे) गट नं.७४, वनक्षेत्रात अनधिकृतपणे खोदकाम करून गौण खनिजे काढून वनक्षेत्राची नासधूस होत असल्याची बाब माहे सप्टेंबर २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५ मीटर रुंद ४ मीटर खोलीचे व साधारणत: ५० ते १०० मीटर लांबीच्या वनक्षेत्रात संबंधित अतिक्रमण धारकांनी खोदकाम करून त्यातील वन खनिजांच्या झाडांची नासधूस केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय असल्यास चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०३-२०१७)** :(१) व (२) मुख्य अभियंता (पथ), पुणे महानगरपालिका, पुणे यांना वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मौजे वाघोली ते खराडी रस्त्यासाठी मौजे खराडी येथील गट क्र. ७४ मधील ०.५४ हेक्टर वनजमिन वळतीकरणास महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.१८.४.२०१६ अन्वये काही अटींच्या अधिन राहून तत्वत: मान्यता दिलेली आहे.

केंद्र शासनाच्या दि.०७.०५.२०१५ रोजीच्या मार्गदर्शक सूचना आणि शासन महसूल व वन विभाग, मुंबई यांचेकडील परिपत्रक दि.०१.०७.२०१५ अन्वये एकरेषीय प्रकल्पामध्ये तत्वत: मंजूरी दिल्यानंतर प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने तत्वत: मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केलेनंतर वनक्षेत्रावर काम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने उपरोक्त वनजमिनीवर काम करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय दि.०८.११.२०१६ अन्वये प्रस्तावास अंतिम मान्यता प्रदान केली आहे. त्यामुळे वनक्षेत्रात होत असलेले खोदकाम हे अधिकृतपणे करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील दरेगाव शिवार हे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ लगत वन विभागाची जमिन विकसित करण्याबाबत**

**(३०) ६७८५० (२७-०१-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील दरेगाव शिवार हे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ लगत वन विभागाची जमिन सर्वे नं. ८३/२ याठिकाणी उद्यान विकसित करण्याबाबत स्थानिकांची अनेक वर्षापासून मागणी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, पर्यटन विभाग यांच्याकडे एका पत्राद्वारे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन याठिकाणी उद्यान विकसित करण्यासाठी वनविभागची जमीन व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) मौजे दरेगाव ता.मालेगाव येथील गट क्र.८३ पैकी ८३/१ वन विभागाच्या नावे असून उर्वरीत ८३/२ ते ८३/२३ हे हिस्से महसूल विभागाकडून वाटप करण्यात आले आहेत. महसूल विभागाकडून वाटप केलेले क्षेत्र व वन विभागाचे क्षेत्र यांच्या हद्दी सुनिश्चित नाहीत. सदर क्षेत्राच्या हद्दी सुनिश्चित करण्याची कार्यवाही क्षेत्रीयस्तरावर सूरू आहे. सदर क्षेत्राच्या हद्दी निश्चित झाल्यावर त्या ठिकाणी वन उद्यान /पर्यटन स्थळ विकासित करण्याच्या अनुषंगाने नियोजित आहे.

---

**कोल्हापुर जिल्ह्यात वन्य प्राण्यांची हल्ले होण्याच्या प्रकारात वाढ झाल्याबाबत**

**(३१) ६७८८४ (०९-०१-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर जिल्ह्यात मानव आणि वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र होत असून शेतकरी व ग्रामस्थांवर वन्य प्राण्यांची हल्ले होण्याच्या प्रकारात वाढ झाल्याची बाब माहे ऑक्टोंबर २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दोन वर्षात दोन बिबटयांच्या मृत्यू झाला असून अनेक शेतकरी व ग्रामस्थ वन्य प्राण्यांच्या हल्यात जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मानव आणि वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०२-२०१७) :**(१) हे खरे नाही.
तथापि दिनांक ०३.१०.२०१६ रोजी मौजे लोळणे, ता. शाहुवाडी येथे बिबट्याच्या हल्ल्यात ३ व्यक्ती जखमी झाल्याची घटना घडली आहे.
(२) दिनांक ०१.०१.२०१५ रोजी कोल्हापूर शहरातील रुईकर कॉलनी परीसरात ४ व्यक्ती तर दिनांक ०३.१०.२०१६ रोजी मलकापूर, परिक्षेत्रातील मौजे लोळणे, ता. शाहुवाडी येथे ३ व्यक्ती असे एकूण ७ व्यक्ती बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झाले आहेत. तसेच मागील २ वर्षात २ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे ही बाब खरी आहे.

(३) मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- Rescue Team तयार करण्यात आली आहे.
- मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने वनअधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.
- या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून सर्वांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्र पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.
- वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.
- परिक्षेत्र स्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील लघुपाटबंधारे योजनेच्या सुधारित मापदंडाबाबत**

**(३२) ६८०८८ (१६-१२-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये लघु पाटबंधारे योजनेचा सुधारीत मापदंड मंजूर न केल्याने राज्यामध्ये लघु पाटबंधारे तलावाची नवीन कामे तसेच जलयुक्त शिवार योजनेतील काही कामे करता येत नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यापूर्वी सन २००९ मध्ये शासनाने लघु पाटबंधारे तलावाचे मापदंडामध्ये दुरुस्ती केली होती, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सुधारीत मापदंडाचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून नियोजन विभागाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत संबंधित विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**प्रा. राम शिंदे (१८-०३-२०१७) :**(१) लघु पाटबंधारे योजनांचे सुधारित मापदंड जलसंपदा विभागाच्या दि. १९/०७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आले आहेत व त्यानुसार अंदाजपत्रके तयार करण्यात येत आहेत.

(२) होय.

यापूर्वी कोकण प्रदेशासाठी दिनांक २९/०७/२००९ व उर्वरित महाराष्ट्रासाठी दिनांक ३०/०४/२०११ च्या जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयान्वये मापदंड सुधारीत करण्यात आले होते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील वन परिक्षेत्रामध्ये विविध योजनेअंतर्गत वनसंरक्षण, निष्कृष्ट वनाचे पुर्नरोपण व जलसंधारणाच्या कामामध्ये केलेला गैरव्यवहार**

**(३३) ६८३८२ (२७-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील वन परिक्षेत्रामध्ये विविध योजनेअंतर्गत वनसंरक्षण, निष्कृष्ट वनाचे पुर्नरोपण व जलसंधारणाच्या कामामध्ये अनियमितता करुन ७ कोटी ३० लाख रुपयाचा गैरव्यवहार केल्याची मुख्य वन रक्षक, यवतमाळ यांच्याकडे तक्रार करण्यात येवूनही वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेवर कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही

अकोला जिल्ह्यातील कारंजा व वाशिम वन परिक्षेत्रामध्ये विविध योजनेंतर्गत वनसंरक्षण, निकृष्ट वनाचे पुनर्रोपण व जलसंधारणाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात दि.२३.०५.२०१६ रोजी बातमी प्रसिध्द झाली आहे. सदर प्रकरणी यापुर्वीच दि.०८.०६.२०१५ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांनी चौकशी केली आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशीत कारंजा व वाशिम वन परिक्षेत्रात अनुक्रमे रु.४१,२०,८२७/- व रु.१९,०९,६६७/- इतक्या रक्कमेची अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम ८ अंतर्गत दोषारोप पत्र बजावून विभागीय चौकशी करिता प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, आयुक्त कार्यालय, अमरावती दि.१४.०६.२०१६ रोजीच्या पत्राअन्वये प्रकरणे सोपविली असुन त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे. त्याच प्रमाणे तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेविरुध्द फौजदारी तक्रार दाखल करण्याबाबत या कार्यालयाने दि.०४.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये उपवनसंरक्षक, अकोला वनविभाग यांना निर्देश देण्यांत आले. त्याअनुषंगाने उपवनसंरक्षक, अकोला वनविभाग त्यांनी त्यांच्या दि.३०.११.२०१६ अन्वये असे कळविले आहे की, दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु केली असल्याने तक्रारदाराचे समाधान झाले असून विभागीय चौकशीमध्ये जो निष्कर्ष प्राप्त होईल त्या निष्कर्षाच्या तिव्रतेच्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द पुढील योग्य कार्यवाही संदर्भात निर्णय घेणे उचित राहील व FIR दाखल करण्याबाबत दिलेले आदेश रद्द करण्यात यावे अशी विनंती या कार्यालयास केली आहे. अशा प्रकारे FIR दाखल करण्याची कार्यवाही विभागीय स्तरावर प्रलंबित असून, असे दिसते की सद्य परिस्थितीत थांबलेली आहे. तव्दतच प्रकरणी दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी चालू असल्याने त्यांचेविरुध्द फौजदारी कार्यवाही करणेबाबत फेरविचार करण्यांची

विनंती उपवनसंरक्षक, अकोला वनविभाग यांनी त्यांच्या दि.१०.०२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पुनश्च: या कार्यालयास केली आहे.

त्याच प्रमाणे संबंधीत दोन्ही वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी उपवनसंरक्षक, अकोला वनविभाग यांची वर उल्लेखीत पत्रे सहपत्रित करुन दि.१९.११.२०१६ व दि.२७.०१.२०१७ रोजी मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सदर कारवाईचा फेरविचार होणेबाबत निवेदनादद्वारे विनंती केली आहे. यासंबंधी वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी दिलेले वरील निवेदनातील बाबींचा तद्वतच उपवनसंरक्षक, अकोला वनविभाग यांच्या दि.३०.११.२०१६ मधील विनंतीचा विचार करुन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रकरणी पुढील कार्यवाही करावी तसेच संबंधिताविरुध्द सुरु असलेली विभागीय चौकशी पुर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यांच्या कार्यालयास सादर करावा असे त्यांच्या दि.०८.०२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सुचित केले. तसेच उपवनसंरक्षक, अकोला वनविभाग, यांनी फौजदारी कार्यवाही न करणेबाबत केलेली विनंती विचारात घेवून विभागीय चौकशीची कार्यवाही शिघ्रतेने पुर्ण करुन प्रकरणी त्या चौकशीच्या अंतिम निकालाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथे शासकीय वैद्यकीय व महाविद्यालय व रुग्णालय येथील कर्मचारी व डॉक्टर एच.आय.व्ही रुग्णांनासोबत भेदभाव करीत असल्याबाबत**

**(३४) ६९५५८ (१६-१२-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील कर्मचारी व डॉक्टर रुग्णांमध्ये भेदभाव करत असल्याची बाब दिनांक १८ ऑक्टोंबर २०१६ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याठिकाणी एच.आय.व्ही. रुग्णांबाबत भेदभाव करण्यात येत असून क्षकिरण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी एक्सरे काढण्यास मनाई केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचारी व डॉक्टरांच्या अश्या वागणूकीमुळे बऱ्याच एच.आय.व्ही रुग्णांना मनस्ताप सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोषी कर्मचारी व डॉक्टरांवर काय कारवाई केली वा करण्यात येणार आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निमगाव (ता.तिरोडा, जि.गोंदिया) लघु सिंचन प्रकल्पाच्या मंजुरीबाबत**

**(३५) ६९६६२ (०९-०१-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगाव लघु सिंचन प्रकल्प (ता.तिरोडा, जि.गोंदिया) च्या मंजुरीबाबत वन जमिनीचे संपादन प्रस्तावास अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्पाचे उर्वरित शिर्ष कामे व कालव्याचे कामे दोन वर्षात पूर्ण करणे नियोजित असूनसुध्दा प्रकल्पाचे वन जमिनीचे संपादन प्रस्तावास अंतिम मंजुरी मिळाली आहे काय

(२) असल्यास, सदर प्रकल्पास शासन मंजुरी प्रदान करणार आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे

(३) असल्यास, त्यामध्ये सदर १३ गावांच्या शेतकऱ्यांना शासन लाभ मिळवून देणार आहे काय व कधी देणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०३-२०१७) :**(१) गोंदिया जिल्हयातील निमगांव लघु पाटबंधारे प्रकल्पाकरिता १४१.६२ हेक्टर वनजमिन वळतीकरणास केंद्र शासनाने दिनांक २८/८/२००६ रोजीच्या पत्रान्वये काही अटींच्या अधीन तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. राज्य शासनाने दि.४/३/२००९ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास अटीपूर्तता अहवाल सादर केला.

केंद्र शासनाने दिनांक २५/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये अनुसूचित जमाती व इतर परंपरागत रहिवाशी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत विहीत नमुन्यातील जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करण्यास कळविले. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे १३५.१५ हेक्टर क्षेत्राकरीताचे प्रमाणपत्र केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी सादर केले आहे.

तथापि, सदर प्रकल्पास १४१.६२ हेक्टर वनजमिनीकरीता तत्वत: मान्यता प्राप्त असून उर्वरीत क्षेत्राची प्रकल्प यंत्रणेस आवश्यकता आहे किंवा कसे ? तसेच उर्वरीत क्षेत्र वनक्षेत्र आहे किंवा कसे ? आणि नक्त वर्तमान मूल्य व पर्यायी वनीकरणाची फरकाची रक्कम इत्यादी मुद्दयांच्या अनुषंगाने आवश्यक माहिती सादर करण्यास केंद्रस्थ अधिकारी, नागपूर व प्रकल्प यंत्रणेस कळविण्यात आले आहे.

(२) व (३) उक्त त्रुटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त होताच केंद्र शासनास तातडीने सादर करण्यात येईल. केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त होताच वनजमिन प्रकल्प यंत्रणेस तातडीने वळती करण्याची कार्यवाही करण्यात येईल. वनजमिन उपलब्ध झाल्यानंतर प्रकल्पाचे काम एक वर्षात पूर्ण करण्याचे प्रकल्प यंत्रणेचे नियोजन आहे.

---

**भिवंडी तालुक्यातील पारिवली वनविभाग कार्यालयाची झालेली दुरवस्था**

**(३६) ६९८८० (२७-०१-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील पारिवली वनविभाग कार्यालयाची दुरवस्था झालेली असून १५ वर्षापासून येथील कामकाज भिवंडी (जि.ठाणे) वनक्षेत्रपालाच्या कार्यालयामधून सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन हक्क कायद्यानुसार आदिवासीना वनपट्टे मिळतात त्यांची माहिती मिळण्यासाठी पारिवली हे मध्यवर्ती ठिकाण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे आदिवासी बांधवाचे अतोनात हाल होत असतांना संबंधित अधिकाऱ्यांचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.
वनपाल पारिवली कार्यालयाचा कारभार चांगल्या स्थितीत असलेल्या इमारतीत सुरु आहे. इमारतीच्या दुरुस्तीबाबतची कामे लवकरच पूर्ण करून घेण्यात येत आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
आदिवासी बांधवांचे वनखात्याकडे वनपट्टेबाबत कोणतेही दावे शिल्लक नाहीत. दाव्यांची पूर्तता वेळोवेळी केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खांडस प्राथमिक आरोग्य (ता.कर्जत, जि.रायगड) केंद्राचा वीज वितरण विभागाने पाणीपुरवठा खंडीत केल्याबाबत**

**(३७) ६९८८६ (१०-०१-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खांडस प्राथमिक आरोग्य (ता.कर्जत, जि.रायगड) केंद्राचे दोन वर्षापासून वीज बिल न भरल्याने आरोग्य केंद्राचे वीज वितरण विभागाने केंद्राचा पाणीपुरवठा खंडीत केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे रुग्णांची तसेच कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रांना पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०३-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सद्य:स्थितीत दररोज बाहेरुन पाणी आणून दैनंदिन कामकाजाकरिता वापरले जात आहे.

(३) व (४) प्राथमिक आरोग्य केंद्र खांडस ता.कर्जत, जि.रायगड करीता स्वतंत्र पाणीपुरवठा योजने कार्यरत आहे. त्यामुळे वीजबील जासत येते. पाण्याच्या विद्युत मीटरचे रु.८४,८३०/- इतक्या रक्मेचे देयक तरतुदीअभावी अदा करण्यात आले नव्हते. त्यामुळे मार्च, २०१५ मध्ये मीटर काढण्यात आले होते. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड या कार्यालयाकडून प्राप्त अनुदान व दान स्वरुपात प्राप्त झालेल्या रकमेतून सदर देयक आता अदा करण्यात आले आहे. सध्या अस्तित्वात असलेली नळ पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायत खांडसकडे वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच प्रत्येक महिन्यात येणाऱ्या देयकापैकी २५ % रक्कम प्राथमिक आरोग्य केंद्र खांडसने व उर्वरीत ७५% रक्कम ग्रामपंचायत खाडंस यांनी भरल्याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्र, खांडस येथील रुग्ण कल्याण समितीने दि.८.१२.२०१६ रोजी ठराव केला आहे. सद्य:स्थितीत दररोज बाहेरुन पाणी आणून दैनंदिन कामकाजाकरिता वापरले जात असून, सदर आरोग्य केंद्रास पाणीपुरवठा पुर्ववत सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) वन विभागाच्या खैराच्या झाडांची वृक्षतोड झाल्याबाबत**

**(३८) ७०४६६ (०९-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील शहापुर तालुक्यातील दहिवली वन विभागाच्या रेंजमध्ये ग्रस्त घालत असताना वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना खैराच्या झाडांची मोठया प्रमाणावर वृक्षतोड झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापकरणी चौकशी करुन यासंदर्भात पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, शहापुर तालुक्यातील खर्डी, कसारा, वाशाला, दहिवली, बिरवाडी पिवळी या परिसरात खैराच्या झाडाची मोठया प्रमाणात वृक्षतोड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०१७)** :(१) दिनांक १५.१०.२०१६ रोजी दहिवली वनपरिमंडळाच्या बावघर नियतक्षेत्रात गस्त करित असताना एकूण पाच इसमांना खैर प्रजातीची लाकडे शिर-ओझ्याने वाहतुक करीत असता पकडण्यात आले. त्यानी तोड केलेल्या मालाच्या बुडांचा शोध घेतला असता ५ खैर प्रजातीची बुड वनक्षेत्रात आढळलीत.

(२) हे खरे आहे.

(३) दिनांक ७.१०.२०१६ रोजी बिरवाडी परिमंडळात अवैध वृक्षतोडीची १४ खैर (६+८) बुडे आढळली.

शहापूर वनक्षेत्रातील खर्डी, कसारा व वाशाळा या वनक्षेत्रात ऑक्टोबर, २०१६ मध्ये खैर वृक्ष तोड आढळून आली नाही. परंतु पिवळी गावालगतचे वनक्षेत्रात खैर १३९ घ.मि. २.८१९ किंमत ३९२०१/- माल अनधिकृतपणे वाहतुक होत असताना वाहन जप्त करण्यात आले.

(४) अवैध वृक्षतोडीवर आळा घालण्यासाठी शहापूर वनविभागात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

१) सर्व नियतक्षेत्राची नियमितपणे तपासणी करणे.

२) शहापूर वन परिक्षेत्रात १) खातिवली, धसई वनपरिक्षेत्रात २) शेणवा, विहीगाव परिक्षेत्रात ३) विहीगाव व खर्डी वनपरिक्षेत्रात ४) शिरोळ येथे तपासणी नाक्यांवर तसेच रस्त्याने संशयास्पदरित्या जाणारी वाहने अवडवून त्यांची झडती घेणेत येते.

३) विशेषत: शहापूर, खर्डी, विहिगाव या परिक्षेत्रासाठी तानसा अभयारण्यात लगतचे क्षेत्रात / अतिसंवेदशशील क्षेत्रात रात्रीगस्त करणेकामी वनपरिक्षेत्र अधिकारी यांना दरमहा गोपनीय कार्यक्रम आखून देण्यात येतो.

४) वन गुन्ह्यासंबंधी गुप्त माहिती मिळविण्यासाठी स्थानिकरित्या खबरे तयार करुन त्यांचेकडील गुप्त माहिती आधारे धाडी टाकून अवैध माल/ वाहने जप्त करणेत येत आहेत तसेच संशयीत व्यक्तींवर अशा खबऱ्याद्वारे नजर ठेवण्याचे काम करण्यात येत आहे.

५) ग्रामीणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन या कार्यक्रमाविषयी स्थानिक जनतेस महत्व विषद करुन त्याद्वारे जनजागृती करणे, वन विभागात स्थापन करण्यात आलेल्या वरसंरक्षण समित्यांच्या वनसंरक्षणाचे कामात सक्रीय सहभाग करणेत येत आहे.

६) सर्व नियतक्षेत्रात वनरक्षक / वनपाल यांना PDA चा पुरवठा करण्यात आला असून गुन्ह्याची नोंद करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**देगलूर (जि. नांदेड) तालुक्यातील व्दारायुक्त सिमेंट बंधाऱ्याच्या कामास मंजूरी देण्याबाबत**

**(३९) ७०५४२ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि. नांदेड) तालुक्यातील देगाव, भोकसखेड, सावरगाव (नि) आणि खुतमापूर येथील द्वारयुक्त सिमेंट बंधाऱ्याच्या कामास मंजुरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०३-२०१७) :**(१) होय.

(२) नांदेड जिल्ह्यातील देगलुर तालुक्यातील देगाव येथील : १, भोकसखेड येथील :-१ व खुतमापुर येथील :४ अशा एकूण ७ योजनांना महाराश्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १७/०२/२०१४ चे आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. महाराष्ट्र जलसंधारण

महामंडळाच्या दिनांक २४.०९.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील विषय क्रमांक ०८ (४९/२०१५) अन्वये महामंडळामार्फत दिनांक ०१ एप्रिल, २०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या (१२०० योजना) तसेच दिनांक ०१ एप्रिल, २०१५ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या (११३० योजना) परंतु प्रत्यक्षात क्षेत्रिय कामे सुरु झाली नाहीत अशा एकूण २३३० स्थगिती दिलेल्या योजनांपैकी दिनांक ०१ एप्रिल, २०१४ पूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेल्या ११३० योजनांपैकी जलयुक्त शिवार अंतर्गत येणाऱ्या १०१ योजनांची कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यास महामंडळाच्या संचालक मंडळाने मान्यता दिली आणि उर्वरित स्थगिती दिलेल्या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली. त्यामुळे संचालक मंडळाच्या दिनांक २४/०९/२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील विषय क्र.०८ (४९/२०१५) वरील पारित ठरावाच्या अनुषंगाने उपरोक्त ७ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत प्रगतिपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील अवर्षन ग्रस्त नांदगांव तालुक्यात जलयुक्त शिवार अभियानांअंतर्गत विविध योजनांचे कार्यक्रमास मंजूरी देणेबाबत**

**(४०) ७१२३० (१६-१२-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील अवर्षण ग्रस्त नांदगांव तालुक्यातील पांझण नदीवरील नाले मोहाडी नदी, लेंडी नदी व येवला तालुक्यातील नारंगी नदी व धामनी नदी या नदी व नाल्यांचे जलयुक्त शिवार अभियानांअतर्गत विविध योजनांचे अभिसरण करून लोकसहभागाद्वारे राबविण्यात येत असलेला नदी पुर्नजीवन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सिमेंट नाला बांध कार्यक्रमास मंजुरी देणेकरिता प्रस्ताव जिल्हाधिकारी नाशिक यांच्या कार्यालयाने दिनांक १५ मार्च २०१६ रोजी व त्यासुमारास शासनाकडे सादर केलेला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावास शासनाने मंजुरी देवून निधीची तरतूद करणेबाबत कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) जलसंधारण विभागाचा शासन निर्णय दि. ३१ मार्च, २०१६ नूसार नांदगाव तालुकयातील पांझन नदी हशा नाला यावरील एकूण ३ सिमेंट नाला बांधासाठी रु. ९८.३० लक्ष निधीस मंजूरी देण्यात आली असून रु. ४९.१५ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे एकशिव कळंब (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथे सिमेंट कॉंक्रिटचा बंधारा बांधण्याबाबत**

**(४१) ७१३७४ (१६-१२-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे एकशिव कळंब (ता.माळशिरस, जि.सोलापूर) बंधाऱ्यात पूर्वीचे रेल्वेचे रुळाचे खांब उभे असून सदर खांबाना नदीपात्रात सिमेंट क्रॉंक्रीटची भिंत बांधून सिमेंट कॉंक्रिटचा बंधारा बांधण्याचा प्रस्ताव लघुपाटबंधारे विभाग, सोलापूर यांनी तयार केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन सदर प्रस्तावास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०३-२०१७) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कुंभारमाठ (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील वृक्ष तोडीसाठी दिलेल्या परवानगीचा दुरुपयोग करुन गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४२) ७१८०७ (०९-०१-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुंभारमाठ (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील मा.स.स.नं. १२/४४ वृक्ष तोडीसाठी दिलेल्या परवानगीचा दुरूपयोग करून केलेल्या गैरव्यवहारा प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांना सावंतवाडी वन विभाग दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार दिनांक ५ मार्च, २०१२ रोजी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे व तद्‌नंतर पुन्हा दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी उपवन संरक्षक, वन विभाग, सावंतवाडी यांचेकडे श्री.जयंत राघवेंद्र बरेगार, सालईवाडा, सावंतवाडी यांनी सादर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू गैरव्यवहार व गैरकारभाराबाबत यापूर्वीही श्री.बरेगार यांनी वारंवार उपवन संरक्षक, सावंतवाडी वन विभाग यांचेकडे केलेल्या तक्रारीनुषंगाने याप्रकरणी वनक्षेत्र सर्वेक्षक, सावंतवाडी वन विभाग यांनी दि.१२ डिसेंबर, २००८ रोजी सविस्तर अहवाल उपवन संरक्षक वन विभाग सावंतवाडी यांना सादर केल्यानंतर उपवन संरक्षकांनी वन क्षेत्रपाल, कुडाळ यांना कार्यवाही करण्याचे दिनांक २ ऑगस्ट, २०११, दिनांक २६ ऑगस्ट, २०११ व दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ रोजी आदेश दिलेले असतानाही आजमितीस याप्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) याप्रकरणी सर्व संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०३-२०१७) :**(१) श्री.जयंत बरेगार यांनी उक्त प्रश्नात नमूद तक्रारी केल्या आहेत.

(२) व (३) उक्त तक्रारीनुसार कुंभारमाठ मालकी स.नं. १२/४ मध्ये वृक्षतोड अधिकारी या नात्याने परवानगी दिलेल्या वृक्षतोड प्रकरणी विभागीय कार्यालयातील वनसर्व्हेक्षक यांनी तपासणी करुन सादर केलेल्या अहवालाचे आधारे सदर स.नं. १२/४४ मध्ये वृक्षतोड झालेली नसताना वृक्ष अधिकारी यांनी चुकीचे तोंडीचे आदेश व खोटे वाहतूक पास जारी केल्यामुळे त्यांना दोषारोपपत्र देण्यात येऊन शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) सदर प्रकरणी वनक्षेत्रपाल, कुडाळ यांना दोषमुक्त करण्यात आलेले असून वनपाल मालवण यांना ते दोषी आढळून आल्याने त्यांची पुढील वेतनवाढ २ वर्षासाठी रोखण्यात आली. तसेच तत्कालीन वनरक्षक, कांदळगाव यांचेविरुध्दची विभागीय चौकशी पुर्ण झाली असून त्यांच्यावर कर्तव्यात हलगर्जीपणा व बेफिकीरपणा केलेबद्दल त्यांचेवर ठपका ठेवण्यात आलेला आहे.

---

**साठवण तलाव ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) योजनेचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत**

**(४३) ७१९२८ (१६-१२-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साठवण तलाव ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) या योजनेचे काम तात्काळ सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजी लघुसिंचन (जलसंधारण) विभागाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या कामाला दिनांक २० ऑगस्ट, २०१४ रोजी जिल्हाधिकारी नाशिक यांनी प्रशासकीय मंजूरी देऊन शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाला सचिव समितीच्या मान्यतेची आवश्यकता नसल्याचे ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तब्बल वर्ष होऊनही या योजनेची सुधारीत तांत्रिक मंजूरी प्रलंबित असल्यामुळे सदर योजनेची निविदा प्रक्रिया होवू शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) च्या अनुषंगाने या योजनेचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे काय

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०३-२०१७) :**(१) व (२) होय.

(३) तांत्रिक मान्यतेची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक २०.०६.२०१६ च्या पत्रान्वये सचिव समितीच्या मान्यतेची अट शिथील केलेली असून प्रस्तावास तांत्रिक मान्यता आणि योजनेसाठी आवश्यक वन जमिन प्रस्तावाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महालखेडा (ता.येवला, जि.नाशिक) येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे बंद पडलेले काम सुरु करण्याबाबत**

**(४४) ७१९४० (१६-१२-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालखेडा (ता.येवला, जि.नाशिक) येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे सन २०१२ मध्ये सुरु झालेले काम अंदाजपत्रकीय निधीपेक्षा अधिक होत असल्यामुळे माहे जून, २०१५ पासून बंद पडलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा महालखेडा (ता.येवला) येथील काम तातडीने सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०३-२०१७) :**(१) होय.

(२) पाया खोदाई संधानकाचे परिमाणात वाढ झाल्याने सुधारित मान्यतेची कार्यवाही क्षेत्रिय विभागामध्ये प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हा प्रशासनाद्वारे बेन्नीतुरा नदीचे पुनर्जीवन करणे व विविध ठिकाणी सिमेंट नाला बंधारा बांधणेबाबतच्या प्रस्तावाबाबत**

**(४५) ७२२०६ (१६-१२-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा प्रशासनाद्वारे बेन्नीतुरा नदीचे पुनर्जीवन करणे व विविध ठिकाणी सिमेंट नाला बंधारा बांधणेबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत वेन्नीतुरा नदीवरील दोन सिमेंट नाला बांधास रु.१००.०० लक्ष निधी मंजुरीस दि.१७ डिसेंबर, २०१६ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चहार्डी व अकुलखेडा (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील गावाच्या जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नदी पुनर्जिवनाच्या कामाबाबत**

**(४६) ७२४३३ (१६-१२-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चहार्डी व अकुलखेडा (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील गावाच्या जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नदी पुनर्जिवन कार्यक्रमांतर्गत शिवारातून वाहणाऱ्या चंपावती नदीवर बंधारे बांधण्याचे नदी पुनर्जिवन कामाबाबत जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१६ रोजी सचिव (जलसंधारण), महाराष्ट्र शासन, मुंबई यांना मंजूरीस्तव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामास मंजूरी देण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर कामास केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे व केव्हापर्यंत हे काम पूर्ण होण्याचे शासनास अपेक्षित आहे ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत चोपडा तालुक्यातील चंपावती नदीवरील दोन सिमेंट नाला बांधास रु.१५३.४२ लक्ष निधी मंजुरीस दि.१७ डिसेंबर, २०१६ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ताजे (जि.पुणे) येथे जलसंधारण विभागाने उभारलेल्या सिमेंटच्या बंधाऱ्याबाबत**

**(४७) ७२६४९ (१६-१२-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा - कामशेत शहराजवळील ताजे येथील ताजुबाई मंदिरामागील ओढ्यावर दोन वर्षापूर्वी जलसंधारण विभागाच्या वतीने दोन सिमेंटचे बंधारे बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, जलसंधारण विभागाने बांधलेल्या बंधाऱ्याची ताजे ग्रामपंचायतमध्ये नोंद व इतर माहिती उपलब्ध नाही, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, बंधारे असलेल्या भागात जमिनीत खडक असल्याने पाणी वाहून जाते, जिरत नाही, बंधाऱ्यात साठलेले पाणी बाष्पीभवन होत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या दोन बंधाऱ्याबाबत शासन स्तरावर चौकशीचे आदेश देण्यात आले आहे काय नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सन २०१३-१४ मध्ये मौजे ताजे येथे दोन सिमेंट नाला बांधाचे काम करण्यात आले आहे. सदर बंधाऱ्याचे कामे सुरु असताना ग्रामपंचायत व ग्रामस्थांना क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून तोंडी सांगण्यात आले होते. काम प्रगतीत असताना ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी कोणतीही हरकत घेतलेली नव्हती.

(३) हे खरे नाही.

सदर बंधाऱ्यांच्या कामामुळे आजूबाजूच्या परिसरातील विहीरींच्या पाणी पातळीत वाढ होऊन अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साकोली तालुक्यातील (जि.भंडारा) भिंमलकसा लघू पाटबंधारे प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करणेबाबत**

**(४८) ७३०२४ (०९-०१-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली तालुक्यातील (जि.भंडारा) २५ वर्षापासून प्रलंबित असलेला भिमलकसा लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम ११६.०३ हे. वनक्षेत्रातील वृक्षतोड आणि सिमांकनाअभावी संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणापणे कामे प्रलंबित होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रशासनाच्या अटींची पुर्तता करुन तातडीने वनक्षेत्रातील वृक्षतोड व सिमांकनाचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने राज्यस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापि, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०२-२०१७)** :(१), (२) व (३) भिमलकसा लघु पाटबंधारे प्रकल्पाकरीता ११६.०३ हेक्टर वनक्षेत्र वळतेकरणाच्या प्रस्तावास केंद्र शासनाने दिनांक १७/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये काही अटींच्या अधीन राहून अंतिम मान्यता प्रदान केली आहे. तथापि, केंद्र शासनाच्या अंतिम मान्यता पत्रातील काही अटींमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे सुधारणा करुन अंतिम मान्यतेचे सुधारीत आदेश निर्गमित करण्यास शासनपत्र दिनांक १७/०२/२०१६ व तद्‌नंतरच्या पत्रांन्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. केंद्र शासनाकडून सुधारीत आदेश प्राप्त होण्याकरीता शासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे. सुधारीत आदेश प्राप्त होताच वनजमिन वळतीकरणाची कार्यवाही राज्य शासन स्तरावरुन तातडीने करण्यात येईल.

---

**वन विभागाने वने आणि वृक्षाच्छादीत क्षेत्रवेगाने वाढविण्याकरीता असलेल्या संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रमामध्ये महिला बचतगटांना डावलल्याबाबत**

**(४९) ७३२९६ (०९-०१-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या वन विभागाने वने आणि वृक्षाच्छादीत क्षेत्रवेगाने वाढविण्याकरीता असलेल्या संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रमामध्ये महिला बचतगटांना डावलण्यात आल्याचे माहे जुलै,२०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय**,**
(२) असल्यास, शासनाने महिला सक्षमीकरण,आर्थिक बळकटीकरणाचे धोरण निश्चित केले असूनही या धोरणाला वनविभागाने छेद देऊन मोहिमेसाठी लागणारी रोपटी बचतगटांच्या महिलांकडून न घेता बचतगटांना सदर मोहिमेपासून दूर ठेवले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या ५ वर्षातील महिला बचतगटांची विविध विकास कामे उपक्रमातील तसेच मर्जीतील कंत्राटदार,पुरवठादारांनाच वनाधिकाऱ्यांनी सहभागी करुन घेतल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणातील संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०३-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
राज्यात सद्य: स्थितीत ग्रामस्तरावर एकुण १२२५६ संयुक्त वनव्यवस्थापन समित्या कार्यरत असून सदर समितीतील सदस्यांमध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. शासनाच्या विविध योजना जसे संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत रोपवाटीकेतील/रोपवनांची कामे प्रामुख्याने महिलांकडून करुन घेण्यास प्राधान्य दिले जाते. तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमधील महिलांसह सर्व सदस्यांचा सक्रिय सहभाग असतो. सदर रोपवाटीकांमार्फत होणारी रोपांची संख्या आवश्यकते पेक्षा कमी असल्यास अशा रोपांची कमतरता महिला बचत गटाकडूनही रोपे खरेदी करुन पुर्तता करण्यात येते. सन २०१६ च्या पावसाळ्यामध्ये रोपांची निर्मिती या योजनेअंतर्गत विविध बचतगटांमार्फत ४,९६,०३१ रोपे तयार करण्यात आली. तसेच सर्व्हेक्षण, सिमांकन, रखवालदरी, संरक्षण, देखभाल, शेणखत पुरवठा करण्याकरिता त्याचा मोबदला देवून इत्यादी कामे महिला बचत गटांना देण्यात आली.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील यवत, खोर, पाटस, पडवी येथे सिमेंट नाला बंधारा बांधणेबाबतचा प्रस्ताव

**(५०) ७३३७८ (१६-१२-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील यवत, खोर, पाटस, पडवी येथे सिमेंटनाला बंधारा बांधणेबाबत रुपये ८ कोटीचा प्रस्ताव माहे ऑक्टोबर - नोव्हेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, प्रस्तावास मान्यता देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) जलसंधारण विभागाचा शासन निर्णय दि. ३१ मार्च, २०१६ नसार दौंड तालुक्यातील देऊळगाव गाडा नाला ८, खोर ओढा ४ व पडवी ओढा १० अशा एकूण २२ सिमेंट नाला बांधासाठी रु.४६४ लक्ष निधीस मंजूरी देण्यात आली असून रु.२३२.०० लक्ष निधी वितरीत करण्यंत आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.